नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

बुद्धाब्द: २५६८. आसाळ्हमासो-सावनमासो

RNI क्रमांक – MHMUL/25/A1620

18 ऑगस्ट 2025 सोमवार 1

संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित




# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष १ ले, अंक ५
पृष्ठे ४, मूल्य १०

साप्ताहिक

"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |

अनुक्रमणिका

२ संपादकीय
२."पालि शिकूया बाबासाहेबांसोबत!"
३. मुख्य लेख
३. कथा, शिलालेख
४. बातम्या
४. वाचकांच्या प्रतिक्रिया

"स्वत:वर विजय मिळवणारा मनुष्य हजारो युद्ध जिंकणाऱ्यापेक्षा श्रेष्ठ आहे."




## ठाणे जिल्हा शाखेचा ३८ वा वर्धापनदिन व स्वातंत्र्यदिन उत्सव संपन्न

कल्याण : दि. १५ ऑगस्ट २०२५, शुक्रवार रोजी दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (भारतीय बौद्ध महासभा) ठाणे जिल्हा शाखेचा ३८ वा वर्धापन दिन तसेच भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहात व उत्साहवर्धक वातावरणात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम सीनियर रेल्वे इन्स्टिट्यूट हॉल, कल्याण येथे दुपारी १२.३० ते सायं. ५.३० या वेळेत पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून आ. भीमराव यशवंतराव आंबेडकर (राष्ट्रीय कार्याध्यक्ष व अध्यक्ष समता सैनिक दल, ट्रस्टी- भारतीय बौद्ध महासभा) उपस्थित होते. त्यांच्या सोबत आ. डॉ. हरीश रावलिया, अ◌ॅड. एस. के. भंडारे, आ. सुषमाताई पवार, अ◌ॅड. डॉ. एस. एस. वानखेडे, आ. बी. एच. गायकवाड, आ. भिकाजी कांबळे, आ. यू. जी. बोराडे यांसारख्या केंद्रीय व राज्य पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर आ. सी. बी. तेलतुंबडे, आ. वसंत पराड, डॉ. राजेश पवार, सुप्रियाताई कासारे, डि. एम. आचार्य, स्वातीताई गायकवाड, सुजाताताई कांबळे, सुनंदाताई पवार, अविंदाताई वाघमारे, विमलानंद कांबळे, के. बी. हंडोरे, जगदीश जाधव, के. पी. गायकवाड, ए. जी. तायडे, डी. टी. सोनवणे आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात आ. भिमराव आंबेडकर साहेबांनी संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या निवडणुकीविरोधी कारस्थानांचा पर्दाफाश कसा झाला हे स्पष्ट केले. तसेच, लवकरच मुंबई येथे महाबोधी महाविहार लढ्यासाठी भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

या सोहळ्यात स्मरणिकेचे प्रकाशन तसेच ज्येष्ठ बौद्धाचार्य, केंद्रीय शिक्षक-शिक्षिका व ज्येष्ठ सैनिकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आ. विजय गायकवाड (अध्यक्ष ठाणे जिल्हा) यांनी भूषवले. सूत्रसंचालन आ. छगन सुरवाडे व आ. निर्मलाताई कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन आ. बापु धोडरे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, महिला व पुरुष कार्यकर्ते तसेच समता सैनिक दलाने परिश्रम घेतले.




## अमरावतीत धम्मक्रांतीची नवी सुरुवात – महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी जनसमर्थन धम्म ध्वज यात्रेद्वारे

(अमरावती) – महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या जनसमर्थनासाठी अमरावती येथे भव्य धम्म ध्वज यात्रा काढण्यात आली. या यात्रेतून "धम्मक्रांतीची नवी सुरुवात" या संदेशासह बौद्ध बांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या धम्मध्वज यात्रेनंतर आयोजित धम्म संवादात भंते विनाचार्य यांनी उपस्थित उपासक-उपासिकांशी संवाद साधला. त्यांनी महाबोधी महाविहार मुक्ती संघर्षाचे महत्त्व पटवून दिले तसेच BT Act 1949 रद्द करण्याची गरज अधोरेखित केली. भंते विनाचार्य यांनी आपल्या मार्गदर्शनात स्पष्ट केले की बुद्धभूमीची खरी मुक्ती मिळाल्याशिवाय जागतिक धम्मचळवळ सशक्त होऊ शकत नाही. यावेळी अमरावतीतील अनेक धम्मबांधवांनी आंदोलनास समर्थन दर्शवले.



## लोकुत्तरा महाविहार भालगांव येथे दोन दिवसीय विपस्सना शिबीर संपन्न 🌼

(चिखली दि. १७ ऑगस्ट २०२५) – लोकुत्तरा महाविहार, भालगांव यांच्या वतीने दोन दिवसीय विपस्सना शिबिराचे आयोजन दिनांक १६ व १७ ऑगस्ट रोजी रा. वो. नगरपरिषद हायस्कूल येथे करण्यात आले. हे शिबीर अखिल भारतीय भिक्खु संघाचे अनुसंघनायक भदंत बोधिपालो महाथेरो यांच्या वैज्ञानिकदृष्ट्या सखोल मार्गदर्शनात उत्साहात संपन्न झाले भदंत बोधिपालो महाथेरो यांनी आपल्या प्रवचनात सांगितले की दैनंदिन जीवनात निर्माण होणारे ताण-तणाव, नैराश्य, क्रोध, मत्सर, द्वेष, गर्व व अहंकार यांसारखे विकार दुःख निर्माण करतात. या विकारांचे निर्मूलन करून मैत्री, दया, करुणा, प्रसन्नता, उदारता, सुख व शांती जीवनात आणण्यासाठी तथागत बुद्धांनी दिलेल्या ध्यान साधनेचा अभ्यास व आचरण आवश्यक आहे. हे शिबिर साधकांना वास्तव जीवनाशी निगडित मार्गदर्शन देणारे ठरले.या शिबिरात १६ वर्षांवरील महिला व पुरुष साधकांनी उत्साहाने सहभाग घेतला. शिबिराचे आयोजन भिक्खु बी. राहूलो (लोकुत्तरा महाविहार शाखा, भालगांव) यांनी केले होते. या प्रसंगी भिक्खु विनयशिल, भिक्खु महानाम, भिक्खु अग्रसेन तसेच आर्याजी शासनप्रिती यांची प्रमुख उपस्थिती होती.शिबिराच्या यशस्वीतेसाठी सुरेंद्र जाधव, जानकीराम घोरपडे, सतीष चव्हाण, प्रदीप साळवे, आर. एस. जाधव, अशोक बनकर, प्रविण डोंगरदिवे, बी. बी. साळवे, निलेश जाधव, प्राचार्य इंगळे व दयानंद निकाळजे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**त्रिपिटकवार्ता साप्ताहिकाचे सदस्यत्व खुले आहे!**

पालि भाषा, संपूर्ण त्रिपिटकाचे अभ्यासपूर्ण विश्लेषण, बौद्ध शिक्षण, धम्म व आंबेडकरी विचारांचा अभ्यासपूर्ण वारसा – दर गुरुवारी आपल्या घरी!

साप्ताहिक प्रकाशन – प्रत्येक गुरुवारी

सदस्यत्व शुल्क:

🔹 3 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते डिसेंबर 2025
🔹 3 महिने: ₹125 (पेपर) + ₹25 (पोस्टल चार्जेस) = *Total- ₹150 /-rs*

🔹6 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते डिसेंबर 2025
🔹 6 महिने: ₹250 (पेपर) + ₹50 (पोस्टल चार्जेस) = *Total- ₹300/-rs*

🔹 12 महिन्यांचा कालावधी:
जुलै 2025 ते 30 जुलै 2026
🔹 1 वर्ष: ₹400 (पेपर) + ₹100 (पोस्टल चार्जेस ) = *Total- ₹500* /-rs

'त्रिपिटकवार्ता' हे साप्ताहिक – पालि भाषा, बुद्ध, धम्म आणि सामाजिक परिवर्तनाचा अभ्यासपूर्ण आवाज!

आपला अंक राखीव ठेवण्यासाठी खालील लिंक भरावी किंवा थेट संपर्क साधावा.

अधिक माहितीसाठी संपर्क:
संपर्क प्रमुख – *सतीश पवार*
📲 मो. 9139509355

👉 मोठ्या प्रमाणात अंक लागणाऱ्यांनी थेट वरील नंबरवर संपर्क साधावा.

नमो बुद्धाय | जयभीम

**TRIPITAK VARTA**
**साप्ताहिकासाठी पेमेंट माहिती**

बँकेची तपशीलावर माहिती :
🔹 Account Name: Tripitak Varta
🔹 Bank Name: Bank of Baroda
🔹 Account No.: 04510200001417
🔹 IFSC Code:- BARB0SHIPOO
BANK OF BARODA, SHIVAJI NAGR BRANCH

💬 पेमेंट झाल्यानंतर कृपया आपले नाव आणि स्क्रीनशॉट 9139509355 या WhatsApp नंबरवर पाठवा.

🙏 आपले सहकार्य आम्हाला बौद्ध शिक्षण व समाजप्रबोधन कार्यात बळ देईल.

त्रिपिटक वार्ता साप्ताहिक ✍️ परामर्शदाता मंडळ - प्रा. (डॉ.) प्रफुल्ल गडपाल, प्रा.डॉ.धम्मदीप वानखेडे, डॉ. कीर्तिराज लोणारे, प्रा. विजय मोहिते. संपादकीय मंडळ काय अमित मेधावी, प्रा. रितेश ओव्हाळ, आयु. सतीश पवार, आयु. स्वातीताई गायकवाड

## महाबोधि विहाराचा इतिहास

महाबोधि विहार, ज्याला महाबोधि विहार असेही म्हणतात, हे बिहार राज्यातील बोधगया येथे स्थित एक अत्यंत पवित्र बौद्ध धार्मिक स्थळ आहे. हे विहार त्या ठिकाणी आहे जिथे गौतम बुद्ध यांना बोधिवृक्षाखाली ध्यान करताना ज्ञान प्राप्ती (निर्वाण) झाली. 2002 मध्ये युनेस्कोने याला जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

प्रारंभिक उत्पत्ती

सम्राट अशोकाचे योगदान: महाबोधि विहाराचा प्रारंभिक इतिहास मौर्य सम्राट अशोक (इ.स.पू. ३री शताब्दी) यांच्याशी जोडलेला आहे. बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर अशोकाने बोधगयाला भेट दिली आणि इ.स.पू. २६० च्या सुमारास येथे विहार आणि मठाची स्थापना केली. त्यांनी बोधिवृक्षाखाली वज्रासन (हिरा सिंहासन) स्थापित केले, जे बुद्धांनी ध्यान केलेल्या ठिकाणाचे प्रतीक आहे.

प्रारंभिक संरचना: अशोकाने स्थापित केलेले मूळ विहार आणि स्तूप साध्या स्वरूपाचे होते. यामध्ये बुद्धांच्या चरणचिन्हांनी सुशोभित एक स्मारक स्तंभ आणि पत्थराची रेलिंग यांचा समावेश होता. ही रेलिंग बोधगयातील सर्वात प्राचीन अवशेषांपैकी एक आहे.

गुप्तकालीन विकास

वर्तमान विहार संरचना: आज दिसणारे महाबोधि विहार प्रामुख्याने गुप्त काळात (इ.स. ५वी-६वी शताब्दी) बांधले गेले. हे विहार पूर्णपणे विटांनी बांधलेले असून, पूर्व भारतातील सर्वात प्राचीन विटांच्या संरचनांपैकी एक आहे. याची रचना पिरॅमिडसदृश आहे, ज्यामध्ये ५५ मीटर उंच केंद्रीय लाट (शिखर) आणि चार कोपऱ्यांवर छोट्या लाटा आहेत.

वास्तुकला: विहाराच्या भिंतींवर बुद्धांच्या जीवनातील प्रसंग कोरलेल्या आहेत. गर्भगृहात बुद्धांची एक विशाल मूर्ती आहे, जी पाल राजवंशाने (इ.स. ८वी-१२वी शताब्दी) स्थापित केली असावी. ही मूर्ती भूमिस्पर्श मुद्रेत आहे, जी बुद्धांच्या ज्ञानप्राप्तीचे प्रतीक आहे.

बौद्ध धर्माचा पतन आणि उपेक्षा

आक्रमणे आणि पतन: इ.स. ११व्या शताब्दीनंतर, हुण आणि इस्लामी आक्रमणांमुळे बौद्ध धम्माचा प्रभाव कमी झाला. महाबोधि विहाराची उपेक्षा झाली, आणि काही काळ ते हिंदू धार्मिक स्थळ म्हणून वापरले गेले.

बर्मी योगदान: १३व्या शताब्दीपासून बर्मी (म्यानमार) भिक्षूंनी विहाराचे संरक्षण आणि जीर्णोद्धार केले. १९व्या शताब्दीपर्यंत बर्मी शासकांनी विहाराच्या दुरुस्त्या आणि चारही बाजूंनी भिंतींचे पुनर्बांधणी केली.

आधुनिक काळातील पुनरुद्धार

ब्रिटिश काळातील जीर्णोद्धार: १८८० च्या दशकात, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचे संस्थापक अलेक्झांडर कनिंगहॅम आणि जोसेफ डेव्हिड बेगलर यांच्या मार्गदर्शनाखाली विहाराचा जीर्णोद्धार झाला. यावेळी विहाराच्या अनेक भागांची दुरुस्ती झाली, आणि त्याला त्याचे मूळ स्वरूप परत मिळाले.

युनेस्को मान्यता: २००२ मध्ये, युनेस्कोने महाबोधि विहाराला जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता दिली, ज्यामुळे त्याचे जागतिक महत्त्व अधोरेखित झाले.

सोनेरी आवरण: २०१३ मध्ये, थायलंडच्या राजाने आणि बौद्ध अनुयायांनी विहाराच्या शिखराला २८९ किलो सोन्याने झाकले, ज्यामुळे त्याचे सौंदर्य आणि आध्यात्मिक महत्त्व वाढले.

१९४९ चा कायदा: १९४९ च्या बोधगया विहार कायद्याने विहाराला राष्ट्रीय स्मारक म्हणून घोषित केले आणि त्याचे व्यवस्थापन एका विशेष समितीकडे सोपवले.

विहार परिसरातील महत्त्वाचे स्थळे महाबोधि विहार परिसर ४.८६ हेक्टर क्षेत्रात पसरलेला आहे आणि यात अनेक महत्त्वाच्या संरचना आहेत:

बोधिवृक्ष: हा पीपल वृक्ष आहे, जो मूळ बोधिवृक्षाचा वंशज आहे. याच्याखाली बुद्धांना ज्ञान प्राप्ती झाली.

वज्रासन: बुद्धांनी ध्यान केलेल्या ठिकाणी स्थापित केलेला हिरा सिंहासन.

अनिमेष लोचन चैत्य: येथे बुद्धांची खडी मूर्ती आहे, जी त्यांनी दुसऱ्या आठवड्यात येथे घालवलेल्या वेळेचे प्रतीक आहे.

चंकमना: तिसऱ्या आठवड्याचे प्रतीक, जिथे काळ्या पत्थरावर कमळाचे फूल कोरले आहे.

रत्नाघारा: चौथ्या आठवड्याचे ठिकाण, जिथे बुद्धांच्या ध्यानातून प्रकाश किरण निघाले होते.

मुचलिंदा सरोवर: सहाव्या आठवड्याचे ठिकाण, जिथे सापाने बुद्धांचे संरक्षण केले होते.

राजायतना वृक्ष: सातव्या आठवड्याचे ठिकाण, जिथे बुद्ध दोन बर्मी व्यापाऱ्यांना भेटले.

इ.स. १३व्या शताब्दीपर्यंत विहार जीर्ण-शीर्ण अवस्थेत होते. बोधिवृक्षालाही अनेकदा नुकसान झाले, जसे की राजा शशांकाने (इ.स. ६००) त्याला नष्ट केले होते.

विहाराचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व

धार्मिक महत्त्व: महाबोधि विहार हे बौद्ध धर्मातील चार पवित्र स्थळांपैकी एक आहे (लुंबिनी, बोधगया, सारनाथ, कुशीनगर). येथे बुद्धांना वैशाख पूर्णिमेला ज्ञान प्राप्ती झाली, ज्यामुळे हे बौद्ध अनुयायांसाठी सर्वात पवित्र स्थळ आहे.

सांस्कृतिक महत्त्व: विहाराच्या रेलिंगवर सुंगा काळातील (इ.स.पू. १५०) बलुआ पत्थर आणि गुप्त काळातील ग्रॅनाइट नक्षीकाम आहे

आधुनिक घटना: २०१३ मध्ये विहार परिसरात ८ साखळी बॉम्बस्फोट झाले, ज्यात दोन भिक्खूंसह पाच जण जखमी झाले. यामुळे विहाराच्या सुरक्षेवर अधिक लक्ष दिले गेले.

आजूबाजूचे मठ आणि विहार

तिबेटी मठ: १९३४ मध्ये बांधलेला, महाबोधि विहारापासून पाच मिनिटांच्या अंतरावर.

बर्मी विहार: १९३६ मध्ये बांधलेला, निरंजना नदीच्या तीरावर.

थाई मठ: १९५६ मध्ये थायलंडच्या राजपरिवाराने बांधलेला, सोन्याने मढवलेली छत असलेला.

चीनी विहार: १९४५ मध्ये बांधलेला, १९९७ मध्ये नूतनीकरण.

जपानी आणि व्हिएतनामी विहार: १९७२-७३ आणि २००२ मध्ये बांधलेले, बुद्धांच्या जीवनावरील चित्रे आणि मूर्तींसह.

निष्कर्ष

महाबोधि विहार हे केवळ धार्मिक स्थळ नसून, बौद्ध धर्म आणि भारतीय इतिहासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. सम्राट अशोकाने स्थापित केलेल्या या विहाराने गुप्त, पाल, बर्मी आणि ब्रिटिश काळात अनेक बदल पाहिले. आजही हे बौद्ध अनुयायांसाठी शांती, ध्यान आणि आध्यात्मिक प्रेरणेचे केंद्र आहे. बोधिवृक्ष आणि इतर सात पवित्र स्थळे याला जागतिक तीर्थक्षेत्र बनवतात

### पालि भाषा अभ्यासकांसाठी नोकरीच्या संधी: एक नवीन वाट

आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानाच्या युगात, जुन्या भाषांचा अभ्यास करण्याला फारसे महत्त्व दिले जात नाही, असे वाटते. पण काही प्राचीन भाषा अशा आहेत, ज्या आपल्या सांस्कृतिक वारशाला जोडतात आणि नवीन करिअरच्या दारं खुली करतात. त्यापैकी एक महत्त्वाची भाषा म्हणजे पाली. पाली ही प्राचीन भारतीय भाषा आहे, जी बौद्ध धर्माच्या त्रिपिटक आणि इतर ग्रंथांचा आधार आहे. ही भाषा फक्त धार्मिक ग्रंथांपुरतीच मर्यादित नाही, तर ती अभ्यासकांसाठी व्यावसायिक संधींचा सोनेरी मार्ग ठरू शकते. या लेखात, आपण पाली भाषेच्या अभ्यासाच्या महत्त्वाबद्दल, त्यातून निर्माण होणाऱ्या नोकरीच्या संधींबद्दल, आणि त्या संधी मिळवण्यासाठी काय करावे याबद्दल माहिती घेऊया.

पालि भाषेचे मूळ आणि महत्त्व

पालि ही प्राचीन मध्य भारतीय प्राकृत भाषेची एक शाखा आहे, जी बौद्ध धर्माच्या प्रसारासोबत वाढली. तिसऱ्या शतकात सम्राट अशोकाने आपले शिलालेख प्राकृत आणि पालित लिहिले, ज्यामुळे ही भाषा ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाची ठरली. बौद्ध त्रिपिटक—विनयपिटक, सुत्तपिटक, आणि अभिधम्मपिटक—ही ग्रंथसंपदा पालीत लिहिली गेली आहे, जी बौद्ध तत्त्वज्ञानाचे आणि भारतीय संस्कृतीचे एक मोठे भांडार आहे. ही भाषा श्रीलंका, थायलंड, म्यानमार, आणि कंबोडिया यांसारख्या बौद्ध-प्रधान देशांमध्येही प्रचलित होती, ज्यामुळे तिचा जागतिक स्तरावर प्रभाव आहे. पालिला 2024 मध्ये भारत सरकारने शास्त्रीय भाषेचा दर्जा दिला, ज्यामुळे या भाषेच्या संवर्धन आणि अभ्यासाला अधिक चालना मिळाली आहे. ही भाषा केवळ धार्मिक नाही, तर ती भाषाशास्त्र, इतिहास, आणि सांस्कृतिक अभ्यासाच्या दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. पाली शिकणाऱ्यांना प्राचीन ग्रंथांचे भाषांतर, संशोधन, आणि जतन करण्याची संधी मिळते, जी आधुनिक युगातही उपयुक्त ठरते.

#### पालि अभ्यासकांसाठी नोकरीच्या संधी

पालि भाषेचा अभ्यास करणाऱ्यांसाठी अनेक व्यावसायिक क्षेत्रे खुली आहेत. या संधी पुढीलप्रमाणे आहेत:

शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्र: पालि भाषेच्या अभ्यासासाठी विद्यापीठे आणि महाविद्यालये प्राध्यापक आणि संशोधकांची गरज असते. मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, आणि दिल्ली विद्यापीठात पालिचे एम.ए. आणि पीएच.डी. अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. तसेच, नागर्जुन प्रशिक्षण संस्थेसारख्या ठिकाणी प्रमाणपत्र अभ्यासक्रमांद्वारे शिक्षण दिले जाते. या संस्थांमध्ये पालिचे प्राध्यापक किंवा संशोधक म्हणून काम करता येते.

धार्मिक आणि सांस्कृतिक संस्था: बौद्ध विहार, मंदिरे, आणि सांस्कृतिक संघटना पाली ग्रंथांचे जतन, भाषांतर, आणि प्रचारासाठी अभ्यासकांना नियुक्त करतात. विशेषत: बोधगया, सारनाथ, आणि श्रीलंका येथे अशा संधी आहेत. थायलंड आणि म्यानमारमधील बौद्ध केंद्रांमध्येही पालि अभ्यासकांची मागणी आहे.

अनुवाद आणि प्रकाशन: पालि ग्रंथांचे मराठी, हिंदी, इंग्रजी किंवा इतर भाषांमध्ये भाषांतर करण्याचे काम मोठ्या प्रमाणात चालते. प्रकाशन गृहांमध्ये पालि ग्रंथांचे संपादन आणि प्रकाशनासाठी तज्ज्ञांची गरज असते. तसेच, डिजिटल ग्रंथालये तयार करण्यासाठी पालि अभ्यासकांना संधी मिळतात.

पुरातत्व आणि संग्रहालये: पुरातत्व सर्वेक्षण विभाग (ASI) आणि संग्रहालयांमध्ये पालि शिलालेखांचा अभ्यास, त्यांचे भाषांतर, आणि जतनासाठी काम करता येते. अशोकाच्या शिलालेखांचे संशोधन हे याचे एक उदाहरण आहे.

परराष्ट्रीय संधी: विदेश मंत्रालय, दूतावास, आणि सांस्कृतिक परिषदांमध्ये (उदा., इंडिक सिव्हिलायझेशन काउंसिल) पालि भाषेच्या ज्ञानाचा उपयोग होतो. बौद्ध देशांतील सांस्कृतिक देवाणघेवाणीच्या प्रकल्पांमध्येही सहभागी होता येते.

या सर्व क्षेत्रांमध्ये पालि अभ्यासकांना चांगली मानधन आणि मानसन्मान मिळतो, परंतु यासाठी विशेष कौशल्यांची गरज असते.

आवश्यक कौशल्ये आणि तयारी

पालि भाषेच्या अभ्यासकाला नोकरी मिळवण्यासाठी काही विशिष्ट कौशल्ये विकसित करावी लागतात:

भाषेचा प्रगत अभ्यास: पालि व्याकरण, शब्दकोश, आणि ग्रंथांचे वाचन समजून घेणे आवश्यक आहे. बौद्ध त्रिपिटक आणि कमलपिटक यांचा अभ्यास फायदेशीर ठरतो.

इतर भाषांचे ज्ञान: इंग्रजी, संस्कृत, आणि प्राकृत भाषेचे ज्ञान पालि अभ्यासाला समृद्ध करते. तसेच, थेरवादी बौद्ध देशांतील स्थानिक भाषा (उदा., सिंहली, थाई) शिकणे चांगले.

संशोधन कौशल्य: ऐतिहासिक ग्रंथांचे विश्लेषण, भाषांतर, आणि लेखन कौशल्य आवश्यक आहे.

प्रमाणपत्र आणि पदवी: एम.ए. (पालि), पीएच.डी., किंवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण करणे नोकरीसाठी महत्त्वाचे आहे. ऑनलाइन अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत.

सॉफ्ट स्किल्स: संयम, सातत्य, आणि संशोधनाची आवड ही गुणवत्ता अभ्यासकांसाठी महत्त्वाची आहे.

आव्हाने आणि उपाय

पालि भाषेच्या अभ्यासात काही आव्हाने आहेत. ही भाषा आता प्रचलित नाही, त्यामुळे त्याचा वापर मर्यादित आहे. तसेच, या क्षेत्रात स्पर्धा कमी असली तरी नोकरीच्या संधींसाठी विशेषीकरण आवश्यक आहे. यावर उपाय म्हणून, युवकांनी पालीसोबत आधुनिक तंत्रज्ञान (उदा., डिजिटल ग्रंथालये, AI-आधारित भाषांतर) यांचा अभ्यास करावा. तसेच, परदेशी बौद्ध संस्थांमध्ये सहभागी होऊन अनुभव मिळवावा.

पुढील माहिती पान क्र . 4 . . . . . .

## प.पु.बोधिसत्व "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथांमधील पालि भाषा, संभाषण व व्याकरण : एक अभ्यासमालिका"

"अय्यको च अय्यिका च पितामहो च मातामही च, पिता च माता च पुत्तो च धीता च, भाता च भगिनी च, मांतुलो च मातुलानी च, चूलपिता च चुल्लमाता च, पितुच्छा च मातुच्छा च, भातुपुत्तो च भगिनेय्यो च, भातुधीता च भागिणेय्या च, देवरो च ननन्दा च, जेठ्ठभाता च कणिट्ठभाता च, जेठ्ठभगिनी च कणिट्ठभगिनी च, पति च भरिया च, जामाता च सुणीसा च, सालोहितो सब्बे समग्गा वसन्ति।"



### संबंध (Relations)

Aunt, (maternal uncle's wife): मातुलानी, मावशी, मौसी

Great-grand-mother: पय्यिका, मातामही, पणतूची आजी, परदादी

(paternal uncle's wife): चुल्लमाता, चुलत आजी/काकी, चाची

Great-grand-son: पनत्ता, पणतूचा मुलगा, परपोता

Blood relation: सालोहितो, रक्तसंबंध, रक्त संबंध

Husband: पति, भत्ता, नवरा, पति

Brother: भाता, भाऊ, भाई

Husband's brother: देवरो, देवर, देवर

Brother-in-law: कालो, मेहुणा, जीजा/साला

Maternal Uncle: मांतुलो, मामा, मामा

Child: दारको, मूल, बच्चा

Mother: माता, अम्मा, आई, माँ

Cousin, (Paternal aunt's son): पितुच्छापुत्तो, आत्या-मुलगा, चचेरा भाई/बहन

Mother-in-law: सस्सु, सासू, सास

Daughter: धीता, मुलगी, बेटी

Nephew, (Brother's son): भातुपुत्तो, भाच्चा, भतीजा

Daughter-in-law: सुणीसा, सून, बहू

Niece, (Sister's daughter): भागिणेय्या, भाची, भांजी

Elder-brother: जेठ्ठभाता, मोठा भाऊ, बड़ा भाई

Niece (Brother's daughter): भातुधीता, भाची, भांजी

Elder-sister: जेठ्ठभगिनी, मोठी बहीण, बड़ी बहन

Paternal uncle: चूलपिता, काका, चाचा

Father: पिता, वडील, पिता

Sister: भगिनी, बहीण, बहन

Father-in-law: ससुरो, सासरा, ससुर

Sister-in-law: ननन्दा, नणंद, ननद

Father's sister: पितुच्छा, आत्या, बुआ/चाची

Son: पुत्तो, मुलगा, बेटा

Grand-father: अय्यको; पितामहो, आजोबा, दादाजी

Son-in-law: जामाता, जावई, दामाद

Cousin, (paternal uncle's son): मातुच्छापुत्तो, काका-मुलगा, चचेरा भाई

Mother's sister: मातुच्छा, मामी/आत्या, मौसी

Cousin (maternal uncle's son): चूलपितुपुत्तो, मामांचा मुलगा, ममेरा भाई

Nephew, (sister's son): भगिनेय्यो, भाचीचा मुलगा, भतीजा

Grand-mother: अय्यिका; मातामही, आजी, दादी

Wife: भरिया, बायको, पत्नी

Grand-son: नत्ता, नातू, पोता

Younger-brother: कणिट्ठभाता, लहान भाऊ, छोटा भाई

Great-grand-father: मय्यको, पणतूचा आजोबा, परदादा

Younger-sister: कणिट्ठभगिनी, लहान बहीण, छोटी बहन

## अभिधम्म पिटक : बौद्ध तत्त्वज्ञानाचा गाभा

बौद्ध धर्मग्रंथ त्रिपिटक तीन प्रमुख पिटकांमध्ये विभागलेले आहेत—विनय पिटक, सुत्त पिटक आणि अभिधम्म पिटक. या तिन्ही पिटकांपैकी अभिधम्म पिटकाला विशेष स्थान आहे. कारण या पिटकामध्ये बुद्धांच्या गहन विचारांचे, तत्त्वज्ञानाचे आणि मानवी चित्ताच्या (मनाच्या) सूक्ष्म स्वरूपाचे अत्यंत सविस्तर विवेचन केलेले आहे. बुद्धांच्या उपदेशांना प्रत्यक्ष जीवनाशी जोडून समजून घेणे हे जरी सुत्त पिटकाचे कार्य असेल, तरी त्या उपदेशांचा तात्त्विक पाया काय आहे, जग, जीव, चित्त, आणि धम्म यांच्या परस्पर नातेसंबंधांचे मूळ स्वरूप काय आहे, हे अभिधम्म पिटक स्पष्ट करते.

अभिधम्म पिटक सात ग्रंथांनी बनलेले आहे. त्यामध्ये धम्मसंगणी, विभंग, धातुकथा, पुग्गलपञ्ञत्ती, कथावत्थु, यमक, आणि पट्ठान हे ग्रंथ आहेत. हे सर्व ग्रंथ बौद्ध मानसशास्त्र, तत्त्वज्ञान आणि विशुद्ध चिंतनशास्त्र यांचे दालन आहेत.

धम्मसंगणी या ग्रंथात सर्व धम्मांचे (घटकांचे) वर्गीकरण केले आहे. यात चित्त, चेतना, मानसिक घटक आणि भौतिक घटक यांच्या स्वरूपाचे तपशीलवार विवेचन आहे. विभंग ग्रंथात बुद्धांच्या अनेक महत्त्वाच्या संकल्पना—जसे की, खंड, आयतन, धातु, सत्य, इत्यादींचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून विश्लेषण केले आहे. धातुकथा या ग्रंथात धम्मांचे परस्पर संबंध आणि त्यांच्या मूलभूत घटकांची चर्चा आहे. पुग्गलपञ्ञत्तीमध्ये “पुग्गल” म्हणजेच व्यक्तीची ओळख, त्याचे प्रकार आणि त्याचे विवेचन दिले आहे. कथावत्थु हा ग्रंथ विशेषतः महत्वाचा आहे कारण यात विविध बौद्ध संप्रदायांमधील तात्त्विक मतभेदांची चर्चा आहे. यमक हा ग्रंथ तर्कशास्त्रीय पद्धतीने प्रश्नोत्तरांच्या स्वरूपात धम्मांचे स्पष्टीकरण करतो. आणि अखेरीस, पट्ठान हा अभिधम्म पिटकातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा ग्रंथ मानला जातो. यात कारण-कार्य संबंधांचा बारकाईने अभ्यास केला आहे.

अभिधम्म पिटकाचा गाभा म्हणजे चित्त (मन). बौद्ध धर्मानुसार मन हेच केंद्र आहे—जगण्याचे, अनुभवाचे आणि पुनर्जन्माचे. मनाचे स्वरूप काय आहे, ते कसे कार्य करते, त्याचे विविध प्रकार कोणते आहेत, आणि ते कशामुळे कलुषित किंवा शुद्ध होते, याचा सखोल अभ्यास अभिधम्मात आढळतो. चित्ताची ८९ (किंवा काही वर्गीकरणानुसार १२१) प्रकारे विभागणी केलेली आहे. प्रत्येक चित्ताशी संबंधित “चेतसिक” म्हणजे मानसिक घटक असतात. उदाहरणार्थ, लोभ, द्वेष, मोह, श्रद्धा, मैत्री, प्रज्ञा हे सगळे चेतसिक आहेत. या मानसिक घटकांचे शास्त्रीय वर्गीकरण करून मानवी मनोविज्ञान समजावून देणे हे अभिधम्माचे वैशिष्ट्य आहे.

बुद्धांनी प्रत्यक्ष आयुष्यात दुःख आणि त्यावर मात करण्याचा मार्ग सांगितला. पण दुःख का निर्माण होते, मनाची संरचना कशी आहे, कर्म कशा रीतीने कार्य करते, कारण-कार्य संबंध कशा प्रकारे कार्यरत असतात, याचा तात्त्विक आणि विश्लेषणात्मक शोध हा अभिधम्म पिटकात घेतलेला आहे. त्यामुळे अभिधम्म हा केवळ धार्मिक ग्रंथ नाही तर मानसशास्त्र, तर्कशास्त्र आणि तत्त्वज्ञान या तिन्हींचा सुंदर संगम आहे.

अभिधम्म पिटकाला "बुद्धांचे उच्च तत्त्वज्ञान" असे संबोधले जाते. काही परंपरेनुसार बुद्धांनी अभिधम्माचा उपदेश थेट तावतींस देवलोकात आपल्या आईला केला होता आणि नंतर तो सारिपुत्र थेरांनी पृथ्वीवर आणला. या कथेतून अभिधम्माचे गूढ आणि सूक्ष्म महत्त्व अधोरेखित होते.

आधुनिक काळात मानसशास्त्र, मनोविश्लेषण, वर्तनशास्त्र यांचा अभ्यास करताना अभिधम्माची तुलना अनेकदा पाश्चिमात्य मानसशास्त्राशी केली जाते. पाश्चिमात्य शास्त्रज्ञ मनाचा अभ्यास प्रामुख्याने प्रयोगांद्वारे करतात, तर अभिधम्माने तो आत्मपरीक्षण, ध्यान आणि चिंतन यांद्वारे केला आहे. या कारणाने अभिधम्माची उपयुक्तता आजच्या काळातही कमी झालेली नाही. उलट, मानसिक आरोग्य, तणावमुक्ती, ध्यान आणि जागरूकता (mindfulness) या संकल्पनांच्या प्रकाशात अभिधम्म अधिक सुसंगत वाटतो.

अभिधम्म पिटकाचा अभ्यास केल्यावर बुद्धांच्या उपदेशामागील वैज्ञानिक दृष्टिकोन लक्षात येतो. त्यांनी केवळ श्रद्धा किंवा विश्वास यांवर धर्माची पायाभरणी केली नाही, तर निरीक्षण, अनुभव आणि विश्लेषण या पद्धतींवर त्यांनी भर दिला. प्रत्येक घटकाचे (धम्माचे) विश्लेषण करून त्यांचा परस्परसंबंध समजावून दिला. म्हणूनच अभिधम्म हा बौद्ध तत्त्वज्ञानाचा कणा आहे.

आज पाली विद्यापीठे, अभ्यासक, संशोधक, तसेच ध्यानसाधक अभिधम्म पिटकाचा अभ्यास करतात. या अभ्यासातून त्यांना मानवी मनाच्या कार्यपद्धतीची सखोल जाण होते आणि जीवनातील दुःख निवारणाचा शास्त्रीय मार्ग समजतो.

सारांशतः, अभिधम्म पिटक हा बुद्धांच्या गहन तत्त्वज्ञानाचा शुद्ध, विश्लेषणात्मक आणि तर्कशुद्ध ग्रंथसंग्रह आहे. यातून बौद्ध धर्माचा वैज्ञानिक, मानसशास्त्रीय आणि तात्त्विक पाया दिसून येतो. मानवी मन आणि धम्म यांच्या सूक्ष्म अभ्यासामुळे अभिधम्म पिटक बौद्ध त्रिपिटकातील मुकुटमणी ठरतो.

## झेन गुरु आणि चोर



एका दुर्गम गावात झेन गुरु राहात होते. त्यांचं नाव र्योका होतं. त्यांचं आयुष्य अगदी साधं होतं. एक लहानशी झोपडी, अंगावर फक्त एक जुना झगा, खाण्यासाठी थोडंसं अन्न, आणि ध्यान करण्यासाठी शांत वातावरण – एवढंच त्यांच्याकडे होतं.

र्योका यांचं जीवन खूप वेगळं होतं. ते कोणत्याही प्रकारचं संपत्ती किंवा वस्तू जवळ ठेवत नसत. लोक त्यांना भेटायला येत, पण ते त्यांच्याशी फार कमी बोलत. बहुतेक वेळ ते शांत ध्यानात बसत. तरीही गावकरी त्यांचा आदर करत, कारण त्यांच्या चेहऱ्यावर एक विलक्षण शांतता होती.

चोराचा प्रवेश

एकदा असंच झालं की गावाजवळ राहणारा एक चोर त्या झोपडीकडे गेला. गावकऱ्यांकडून त्याने ऐकलं होतं की या गुरुंकडे काही मौल्यवान वस्तू नाहीत, पण तरीही त्याला वाटलं की प्रयत्न करावा.

“गुरु प्रसिद्ध आहेत, कदाचित दान म्हणून लोकांनी त्यांना काही सोने, चांदी दिलं असेल,” असा विचार करून तो रात्रीच्या अंधारात झोपडीत शिरला.

झोपडी फारच साधी होती. भिंती मातीच्या, छप्पर गवताचं, आत एकच चटई, एक छोटं भांडं, आणि एका कोपऱ्यात गुरु ध्यानस्थ बसलेले.

चोराने विचार केला — हा माणूस ध्यानात आहे, मला पाहणार नाही. मी जे मिळेल ते घेऊन जातो.

गुरुंची प्रतिक्रिया

पण गुरुंनी डोळे उघडले. चोराला पाहिलं आणि ते शांतपणे म्हणाले —

“स्वागत आहे. तू कदाचित थकलास. तुला झोपायचं असेल तर ती चटई घे.”

चोर थबकला. त्याला अपेक्षा होती की गुरु घाबरतील, ओरडतील, विरोध करतील. पण इथे उलट स्वागत झालं होतं!

गुरु पुढे म्हणाले —

“माझ्याकडे फारसं काही नाही, पण जे आहे ते तुला हवं असेल तर घेऊन जा. तुझ्या प्रवासाला ते उपयोगी पडेल.”

चोराच्या मनात गोंधळ उडाला. हा माणूस माझ्याशी एवढा नम्र का बोलतोय? मला चोर समजून अपमान करायला हवा होता ना?

रात्र सरली

चोराने काही वस्तू हातात घेतल्या, पण फारसं काही नव्हतंच. झोपडी जवळपास रिकामीच होती. त्याने भांडे उचलले, चटईकडे पाहिले. गुरु पुन्हा म्हणाले —

“जर तुला थंडी वाजत असेल तर हा झगा घे. माझ्यासाठी तुझं सुख महत्त्वाचं आहे.”

चोराच्या डोळ्यात पाणी आलं. पण तो काही बोलला नाही. तो चोर होता, त्याचं काम चोरी करणं होतं. म्हणून तो काहीतरी घेऊन झोपडीबाहेर निघून गेला.

दुसऱ्या दिवशी सकाळ

सकाळी गुरु बाहेर आले. त्यांनी सूर्योदय पाहिला आणि हळूच पुटपुटले —“काल माझा पाहुणा आला होता. पण दुर्दैव, मी त्याला काहीच देऊ शकलो नाही. काही दिलं असतं तर आनंद झाला असता.”

गावकरी हे ऐकून अचंबित झाले. त्यांनी विचारलं,

“गुरुजी, तो चोर होता! तुम्ही त्याला ‘पाहुणा’ का म्हणत आहात?”

गुरु शांतपणे हसले आणि म्हणाले —

“पाहुणा असो वा चोर, माझ्या दारात येणारा प्रत्येक जण माझा पाहुणाच आहे. आणि पाहुण्याला काही देणं ही माझी जबाबदारी आहे. पण माझ्याकडे देण्यासारखं काहीच नव्हतं, म्हणून मला वाईट वाटतंय.”

बदल

ही गोष्ट लवकरच चोरापर्यंत पोहोचली. त्याने गावकऱ्यांकडून ऐकलं की गुरु म्हणाले —

“माझा पाहुणा आला होता.”

तो स्तब्ध झाला.

मी चोरी करायला गेलो आणि त्यांनी मला पाहुणा म्हटलं? मी त्यांच्याकडून वस्तू हिसकावल्या, आणि ते मला आशीर्वाद देत होते?

त्या रात्री चोर झोपू शकला नाही. त्याच्या मनात सतत गुरुंचा शांत चेहरा येत होता. हळूहळू त्याला जाणवलं की आयुष्यभर त्याने लोकांना फसवलं, दुखावलं, पण हा एक माणूस असा होता ज्याने त्याच्याशी द्वेष केला नाही.

त्याने ठरवलं की तो पुन्हा त्या झोपडीत जाईल.

नवा प्रवास

दुसऱ्या दिवशी तो झोपडीत गेला आणि गुरुंच्या पायाशी पडला. डोळ्यातून अश्रू वाहत होते.

तो म्हणाला —

“गुरुजी, मी चोर आहे. पण तुमच्या दयाळूपणामुळे माझ्या अंतर्मनात काहीतरी हललं आहे. मला बदलायचं आहे. मला मार्ग दाखवा.”

गुरुंनी त्याला उचललं आणि हळूच म्हणाले —

“आजपासून तू चोर नाहीस. आजपासून तू एक शोधक आहेस. आणि प्रत्येक शोधकाला योग्य मार्ग सापडतो.”

त्या दिवसानंतर तो चोर गुरुंचा शिष्य झाला. त्याने चोरी सोडली आणि साधेपणाने जगायला सुरुवात केली. गावकऱ्यांनीही त्याला स्वीकारलं. हळूहळू तो स्वतः एक साधू बनला, आणि लोकांना करुणेचा संदेश देऊ लागला.

जीवनपाठ

या कथेचा सार अगदी सोपा आहे, पण अत्यंत गहन आहे:

करुणा आणि दयाळूपणा यामुळे कोणाच्याही अंतर्मनात बदल घडवता येतो.

ज्याला आपण "वाईट" समजतो, त्याच्यातही चांगुलपणाचा अंकुर असतो.

द्वेष, राग, शिक्षा यापेक्षा करुणा जास्त शक्तिशाली आहे.

एखाद्याला बदलवायचं असेल तर त्याला प्रेम, आदर, स्वीकार द्यावा लागतो.

## शिलालेख, धम्म आणि सम्राट अशोक: इतिहासाचे जिवंत दस्ताऐवज



### ब्रह्मगिरी शिलालेख
### (BRAHMAGIRI MINOR ROCK EDICT)

स्थान: हा शिलालेख कर्नाटक राज्यातील चित्रदुर्ग जिल्ह्यातील ब्रह्मगिरी गावाजवळील एका टेकडीवर सापडला आहे. हा परिसर मौर्य साम्राज्याच्या दक्षिण सीमेत येतो.

कालखंड: इ.स.पू. 258-256 च्या सुमारास, जेव्हा अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारला होता आणि त्याने आपल्या राज्यात धम्माचे प्रचार सुरू केले होते, त्यानंतरच्या काळात हा शिलालेख जारी झाला असावा.

भाषा आणि लिपी: हा शिलालेख प्राकृत भाषेत लिहिला गेला असून, ब्राह्मी लिपीत कोरला आहे. ही भाषा आणि लिपी त्या काळात दक्षिण भारतातही प्रचलित होती.

आशय:

या शिलालेखात अशोक स्वतःला "देवानांपिय" (प्रिय देवांचा) आणि "पियदसि" (सर्वांना प्रिय) म्हणून ओळखतो, ज्यामुळे त्याची ओळख स्पष्ट होते.

त्यात अशोक सांगतो की त्याने बौद्ध धर्म स्वीकारला आणि त्यानंतर त्याने आपले जीवन आणि राज्यकारभार धम्माच्या मार्गाने चालवण्याचा संकल्प केला.

शिलालेखात अहिंसा, सत्यता, दया, आणि लोकांमधील एकता यांचा उल्लेख आहे. अशोकाने आपल्या प्रजेला या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले.

विशेषतः, या शिलालेखात त्याने जनावरांचे बळी देणे आणि हिंसक प्रथा टाळण्यावर भर दिला आहे. तो सांगतो की त्याने अनेक प्रजांना धम्माचे पालन करण्यास प्रोत्साहित केले.

तसेच, त्याने धम्ममहामात्र (Dhamma Mahamatras) नेमले, जे लोकांमध्ये धम्माचे संदेश पोहोचवण्याचे काम करत होते.

ऐतिहासिक संदर्भ: हा शिलालेख kaling युद्धानंतर (इ.स.पू. 261) अशोकाच्या बौद्ध धर्माच्या स्वीकारानंतरच्या काळात जारी झाला. या युद्धानंतर त्याला हिंसेचे दुष्परिणाम समजले, आणि त्याने शांततेचा मार्ग स्वीकारला. ब्रह्मगिरी शिलालेख हे त्याच्या दक्षिण भारतातील प्रजेला धम्माचे संदेश पोहोचवण्याचे प्रयत्न दर्शवतो.

ठळक वैशिष्ट्ये:

हा शिलालेख दक्षिण भारतातील मौर्य राज्याचा विस्तार दर्शवतो.

त्यात अशोकाच्या लोककेंद्रित धोरणांचा उल्लेख आहे, ज्यामध्ये सर्व जाती-धर्माच्या लोकांना समान संदेश दिला गेला. हिंसाचार टाळण्यावर आणि नैतिक जीवनावर जोर.



आधुनिक महत्त्व: ब्रह्मगिरी शिलालेख अशोकाच्या धम्माच्या सार्वभौमिक संदेशाचे प्रतीक आहे, जो आजही शांतता आणि समन्वयाच्या दृष्टिकोनातून प्रासंगिक आहे.





सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बुद्धविहार येथे वर्षावास निमित्त धम्मदेसना संपन्न 🌸
(पुणे) – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बुद्धविहार येथे वर्षावास निमित्त धम्म देणेचा कार्यक्रम अत्यंत मंगलमय वातावरणात संपन्न झाला.
या कार्यक्रमात भन्ते हैतरुंग (व्हिएतनाम) व भन्ते सोमचाई (थायलंड) यांनी उपस्थित उपासकांना सखोल धम्मदेसना दिली.
त्यांच्या प्रवचनातून उपासक-उपासिकांना ध्यान, करुणा आणि मैत्रीभाव यांचा जीवनातील महत्त्वपूर्ण संदेश मिळाला.
यावेळी श्रद्धावान उपासक किशोर वाघमारे तसेच धम्मनिष्ठ उपासिका व मा. उपमहापौर पुणे महानगरपालिका सुनीताताई वाडेकर उपस्थित होत्या.
कार्यक्रमास विद्यापीठ परिसरातील अनेक धम्मबांधव-भगिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पान क्र 2 वरील माहिती ..

### पालि भाषा अभ्यासकांसाठी नोकरीच्या संधी: एक नवीन वाट

निष्कर्ष
यशस्वी उदाहरणे भारतात आणि परदेशात अनेक पाली अभ्यासकांनी यश मिळवले आहे. डॉ. राहुल सांकृत्यायन यांनी पाली आणि बौद्ध साहित्यावर संशोधन करून नाव कमावले. आजही श्रीलंकेतील पाली विद्यापीठांमध्ये भारतीय अभ्यासकांना संधी मिळतात. या यशस्वी व्यक्तींचा अभ्यास आणि प्रेरणा घेऊन नवीन पिढी पुढे येऊ शकते.

पाली भाषेचा अभ्यास हा फक्त शैक्षणिक नाही, तर तो सांस्कृतिक वारसा जतन करणारा आणि करिअरच्या दृष्टिकोनातून फायदेशीर आहे. सरकारने दिलेल्या शास्त्रीय भाषेच्या दर्जाने या क्षेत्राला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. जर तुम्हाला प्राचीन इतिहास, बौद्ध धर्म, किंवा भाषाशास्त्रात रस असेल, तर पाली अभ्यासक म्हणून करिअर निवडणे एक उत्तम पर्याय ठरू शकते. सातत्याने अभ्यास करून, नवीन संधी शोधून, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तुम्ही या क्षेत्रात नाव कमवू शकता. पाली ही फक्त भाषा नाही, तर ती आपल्या वारशाचा एक जीवंत भाग आहे, जो पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवायला हवा.

**त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या प्रचारासाठी समर्पित साप्ताहिक!**
बौद्ध विहार, धम्मसेवक आणि संघटना यांची माहिती पाठवा! "त्रिपिटक वार्ता – पालि भाषेच्या मराठी साप्ताहिकामध्ये" आम्ही दर आठवड्याला खालील समाजप्रबोधनात्मक विभाग चालू करत आहोत: 🔹 १. विहार परिचय विभाग 🔹 २. धम्मसेवक (धम्मकार्य करणाऱ्या व्यक्तींचा परिचय) 🔹 ३. बौद्ध धार्मिक संघटना परिचय, माहितीमध्ये खालील तपशील असावा:
🔸 विहारासाठी: विहाराचे नाव, स्थान, स्थापनेचा इतिहास, प्रमुख भंते/सेवकांचे नाव उपासना, शिबिरे, विशेष कार्यक्रम, एक फोटो (विहार/कार्यक्रमाचा) 🔸 धम्मसेवकासाठी: नाव, शहर, कार्यक्षेत्र, प्रेरणा, योगदान, एक फोटो 🔸 संघटनेसाठी: संघटनेचे नाव, स्थापना वर्ष,उद्दिष्ट, प्रमुख कार्य, विशेष प्रकल्प/ कार्यक्रम, एक फोटो (कार्यक्रम/बॅनर) 📩 ही माहिती खालील WhatsApp नंबरवर पाठवा: 📱 9139509355 📅 दर आठवड्याला नवीन माहिती प्रसिद्ध केली जाईल. लवकरात लवकर आपली माहिती पाठवा! "आपल्या योगदानातून उजळेल त्रिसरण आणि पाली भाषेचा दीप!" त्रिपिटक वार्ता – पालि चा प्रचार, धम्माचा प्रसार!



## सुरत येथे एकदिवसीय धम्म प्रशिक्षण शिबीराचे आयोजन

सुरत : भारतीय बौद्ध महासभा तथा धम्म प्रचारक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सारणाथ बुद्ध विहार, मोदी इस्टेट, नवागाम, सुरत येथे दर रविवारी दुपारी २ ते ५ या वेळेत एकदिवसीय धम्म प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले जाते.
दि. १७ ऑगस्ट २०२५ रोजी आदरणीय वाय. डी. सपकाळ गुरुजी यांनी आपल्या मधुर वाणीमधून बुद्ध वंदना या विषयावर प्रवचन दिले. मागील चार आठवड्यांपासून ते भगवा बुद्धाच्या नऊ गुणांचे सोप्या भाषेत विश्लेषण करत असून या आठवड्यात त्यांनी अनुत्तरो पुरीसदम्म सारथि या गुणाचा सविस्तर उलगडा केला. भगवा बुद्ध हे अनुपमेय असून त्यांच्या तुलनेत कोणीही नाही, असे त्यांनी सांगितले.
या प्रवचनादरम्यान 'पुरीसदम्म सारथि'तील आठ गुणांचे विवेचन करण्यात आले. तसेच पाच अभिज्ञा आणि आठ समापत्ती यांचेही सखोल विश्लेषण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात आनापानसती ध्यान साधना आणि वंदना याने झाली. शेवटी धम्मपालन गाथा म्हणत कार्यक्रमाची सांगता झाली.
या प्रसंगी आयु. दिलीप रामटेके यांचा लहान मुलगा आर्यन याचा वाढदिवस उपस्थितांच्या शुभेच्छांनी साजरा करण्यात आला.धम्म जाणून घेऊ इच्छिणाऱ्या सर्व उपासक–उपासिका यांनी दर रविवारी दुपारी २ वाजता या सारणाथ बुद्ध विहार, मोदी इस्टेट, नवागाम, सुरत येथे उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हा अभ्यासवर्ग पूर्णतः निशुल्क आहे.



**बौद्धाचार्य आयु. धर्मा दशरथ गरड (सर)**
**शैक्षणिक पात्रता : एम.ए. (पालि ), UGC NET — बी.कॉम — GDC & A with CHM — डिप्लोमा इन धम्मलिपी**

## कार्य व कार्यकर्तृत्व

सध्याची नोकरी : खाजगी कंपनीत अकाउंटंट म्हणून कार्यरत — स्वतंत्रपणे अकाउंट्स संबंधित कामे —
✨ सामाजिक व धम्मकार्य ✨
भारतीय बौद्ध महासभा, पुणे चे अधिकृत बौद्धाचार्य
बिबवेवाडी येथे संडे धम्म स्कूल (धम्म संस्कार वर्ग) अंतर्गत मागील ६ वर्षांपासून दर रविवारी सकाळी इयत्ता १ली ते १२वी पर्यंतच्या ४००+ विद्यार्थी-विद्यार्थिनींना विनामोबदला धम्मशिक्षण
गेली १२ वर्षे धम्मप्रसार व सामाजिक कार्यात सातत्यपूर्ण योगदान
🌼 प्रमुख कार्यकर्तृत्व 🌼
विविध भागांमध्ये धम्मदेशना, वंदना व धम्मविषयक मार्गदर्शन —
विद्यार्थी-विद्यार्थिनींना सतत मार्गदर्शन व करिअर काउन्सेलिंग —
पाली भाषा अभ्यासक, प्रसारक व संशोधक
प्रभावी वक्ते व लेखक : धम्म प्रवचनकार व फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचे विचारवंत प्रसारक

### बहुविकल्पीय प्रश्न (MCQ) प्रकारात आहेत आणि प्रत्येक प्रश्नाला चार पर्याय दिले आहे

सम्राट अशोकाचे शिलालेख कोणत्या भाषेत आणि लिपीत लिहिले गेले होते?
A) संस्कृत आणि देवनागरी B) प्राकृत आणि ब्राह्मी
C) हिंदी आणि खरोष्ठी D) तमिळ आणि ग्रंथ
अशोकाच्या शिलालेखांमध्ये "देवानांपिय" या शब्दाचा अर्थ काय आहे?
A) महान राजा B) देवांचा प्रिय
C) शांतिप्रिय D) धर्माचा रक्षक
झेन कथा मुख्यतः कोणत्या दर्शनाशी संबंधित आहेत?
A) बौद्ध B) हिंदू
C) जैन D) सिख
माह बोधि विहार कोणत्या ठिकाणी स्थित आहे,
जिथे अशोकाने बौद्ध धर्माचा प्रसार केला?
A) सारनाथ B) बोधगया
C) कुशीनगर D) लुंबिनी
अशोकाच्या शिलालेखांमध्ये किती बृहद शिलालेखांचा समावेश आहे?
A) 10 B) 12
C) 14 D) 16
पाली डिक्शनरीमध्ये "माता" या शब्दाचा अर्थ काय आहे?
A) वडील B) आई
C) भाऊ D) मुलगा
झेन कथांमध्ये कोणता दृष्टिकोन प्रामुख्याने दर्शवला जातो?
A) भौतिकवादी B) ध्यान आणि अंतर्दृष्टी
C) युद्धनिती D) व्यापार
माह बोधि विहाराशी संबंधित असलेला बोधिवृक्ष कोणत्या प्रकारचा आहे?
A) नीम B) पीपल
C) बोर D) मोह
अशोकाच्या शिलालेखांमध्ये कोणत्या युद्धानंतर त्याने बौद्ध धर्म स्वीकारला?
A) सिंधु युद्ध B) कलिंग युद्ध
C) गंगा युद्ध D) मगध युद्ध

## धम्मपद गाथा (Pali):

**"यथा पि मल्लिकापुप्फं, वण्णगंधेन संपन्नं।
एवं सुभासिता वाचा, कयं सुक्कं पसंसति॥"**

**🌸 मराठी अर्थ:**
**जसे मोगऱ्याचे फूल सौंदर्य व सुगंधाने परिपूर्ण असते, तसेच जे वचन सत्य, हितकारी व मधुर बोललेले असते, ते मनाला आनंदित करते आणि मनुष्य त्याचे कौतुक करतो.**

**🌼 हिंदी अर्थ:**
**जैसे चमेली (मल्लिका) का फूल अपने रूप और सुगंध से पूर्ण होता है, उसी प्रकार उत्तम, सत्य और हितकारी वाणी मन को प्रसन्न करती है और सज्जन उसका आदर करते हैं।**

**🌸 English Meaning:**
**Just as the jasmine flower is complete with both beauty and fragrance, in the same way, well-spoken, truthful, and wholesome words delight the mind and are praised by the wise.**

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



MAHATMA JYOTIBA PHULE (11 APRIL 1827 – 28 NOVEMBER 1890)

हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले |
RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."